एस.सी.सी. नं. ८५/२०२४
गजानन हार्डवेअर वि. काकडे ट्रेडर्स
**नि.क्र. ४७ खाली**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा उलटतपास आरोपीतर्फे त्यांचे विधीज्ञ श्री. एस.एस. सुर्यवंशी यांचेमार्फत**

माझे शिक्षण नववी पर्यंत झाले आहे. मी मजुरी करतो. माझा सुप, टोपली बनवण्याचा धंदा आहे. तो व्यवसाय मी माझे घरीच करतो. माझे घर सोमवार गल्ली, परंडा येथे आहे. माझे घर व फिर्यादीचे दुकानामध्ये ५००मी. चे अंतर आहे. माझे फिर्यादीचे दुकानामध्ये ग्राहक म्हणुन येणे जाणे आहे. हे म्हणणे खरे नाही की,माझे व फिर्यादीचे चांगले मैत्रीचे संबंध आहे. मला न्यायालयाचे साक्ष देणेसाठी समन्स आले नव्हते. फिर्यादीचे सांगणेवरुन मी पुराव्याचे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्रकरणातील आरोपीला पहिल्यांदाच न्यायालयात पाहिले. मी आठवडयातुन दोन ते तीन वेळेस फिर्यादीचे दुकानात जातो. मार्च २०२४ मध्ये मी फिर्यादीचे दुकानातुन किती वेळेस खरेदी केले व कोणत्या कोणत्या तारखेला दुकानात गेलो हे सांगु शकत नाही. आरोपी व फिर्यादी यांचे व्यवहाराबाबत मला माहिती असण्याचे कारण नाही. आरोपीने फिर्यादीला २,९९,०००/- रुपयांचा चेक दिला होता. चेकवर आरोपीचे काय नाव आहे हे मला सांगता येणार नाही. फिर्यादीचे नाव चेकवर संजय कोळगे असे आहे. मला चेकचा नंबर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व फिर्यादीचे मैत्रीचे संबंध असल्यामुळे मी खोटे खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझेसमक्ष फिर्यादीला कोणताही चेक दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीचे सांगणेवरुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.07.28 16:31:34 +0530

( दिलीप गं. जगताप )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा

दिनांक-२८.७.२०२६